# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

### परिपत्रक क्र.२३१/ २०२६

विद्यापीठ निधीतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना मा. व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्रमांक म : ३१०/ २६१०२४ नुसार अंशदायी भविष्य निर्वाह निधी (CPF) ऐवजी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना लागू (EPFO) करण्यात आली होती. वित्त व लेखा विभागाचे परिपत्रक क्र.२५६/२०२५ दि.१६/०९/२०२५ नुसार विद्यापीठ निधीतील सेवकांच्या वेतनातून कपात करण्यात येणारी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेची (EPFO) वर्गणी रक्कम ही या योजनेच्या नियमानुसार मूळ वेतन (Basic Salary) किंवा ईपीएफचे कमीत कमी मूळ वेतन रू.१५,०००/- च्या १२% (जास्तीत जास्त रू.१,८००/-) यापैकी जे कमी असेल ती रक्कम कपात करण्यात येणार आहे व त्यावर तेवढीच रक्कम विद्यापीठाचा हिस्सा म्हणून देण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले होते.

याव्दारे विद्यापीठ निधीतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना कळविण्यात येते की, भारत सरकार राजपत्र क्र. सी.जी.-डी.एल.-अ.-१७०९२०२६-२७६२९९ दि. १७ सप्टेंबर, २०२६ नुसार कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अंतर्गत लागू असलेली वेतन मर्यादा रक्कम रू.१५,०००/- वरून रक्कम रू.२५,०००/- राजपत्र प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून लागू करण्यात आली आहे. विद्यापीठ निधीतील सेवकांना कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना ऑक्टोंबर २०२४ पासून लागू करण्यात आलेली असल्याने सदर राजपत्रामधील वेतन मर्यादेतील बदल सुध्दा लागू आहेत.

नविन मर्यादेनुसार सेवकांच्या हिश्यापोटी रक्कम रू.२५,०००/- च्या १२% म्हणजेच रक्कम रू.३,०००/- कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची वर्गणी दि. १७ सप्टेंबर, २०२६ पासून कपात करण्यात येणार आहे व त्यावर तेवढीच रक्कम विद्यापीठाचा हिस्सा म्हणून देण्यात येणार आहे. सदर कार्यवाही माहे ऑक्टोंबर २०२६ पेड इन नोव्हेंबर २०२६ च्या वेतनापासून अंमलात येईल.

पुढे असेही कळविण्यात येते की, ज्या सेवकांनी कर्मचारी भविष्य निर्वाह निधीमध्ये रू.१,८००/- रकमेव्यतिरिक्त अतिरिक्त रक्कम कपात करण्यास सूचित केले होते त्यांनी सदर कपात यापुढे चालू ठेवण्यात यावी किंवा कसे, याबाबतचा लेखी अर्ज दि.२६/१०/२०२६ पर्यत वेतन कक्षाकडे (Pay Unit) सादर करावा. ज्या सेवकांचे अर्ज प्राप्त होणार नाहीत त्यांची पूर्वीप्रमाणेच अतिरिक्त रक्कम वजावट करण्यात येईल. सदर अतिरिक्त कपात करण्यात आलेल्या रकमेवर विद्यापीठ हिस्सा दिला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

(सीएमए (डॉ.) चारूशीला गायके)
वित्त व लेखा अधिकारी

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा. क्र. वित्त /२०२६-२७/५४
दिनांक : २१/१०/२०२६

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग )
२. मा. संचालक, सर्व प्रशाला )
३. मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग )

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास आणावा, ही विनंती.

E:\SNEHAL GHOLAP\OFFICE LETTERS & FORMATS\CIRCULARS - PAY UNIT\Circulars.doc